प्रसार भारती

भारत का लोकसेवा प्रसारक

आकाशवाणी : मुंबई

आकाशवाणी, मुंबई कार्यालय प्रमुख कार्यालयातर्फे खाली नमूद केलेल्या ठिकाणी कंत्राटी तत्वावर अर्ध वेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

## सांगली (१जागा)

खालील शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय इत्यादी अर्हता प्राप्त तसेच नियुक्तीच्या ठिकाणी राहणा-या व्यक्तीची करार पध्दतीनुसार नियुक्ती करण्यात येईल.

1. आवश्यक शैक्षणिक पात्रता : 1) पत्रकारिता किंवा जन - संज्ञापनातील पदव्युत्तर पदविका / पदवी अथवा मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी आणि किमान दोन वर्षांचा पत्रकारिता अनुभव
   2) उमेदवार संबंधित जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास असावा किंवा त्याचे निवास स्थान जिल्हा मुख्यालय / पालिका हद्दीपासून 10 कि.मी. या परिघात असावे.
2. प्राधान्य : 1) संगणकाचे तसेच वर्ड प्रासेसिंगचे ज्ञान
   २) दूरदर्शन वृत्तांकनासाठी व्हिडिओ कॅमेरा / रेकॉर्डिंग उपकरणांची उपलब्धता
   3) दृक - श्राव्य माध्यमांसाठी वृत्तांकनासह चित्रीकरणाचा अनुभव
3. वयोमर्यादा : उमेदवाराचे वय 24 ते 45 वर्षापर्यंत असावे. (उमेदवाराचा जन्म 1973 ते 1994 या कालावधीत झालेला असावा.
4. मानधन : सुरुवातीला तीन महिन्यांच्या परिविक्षा कालावधीसाठी मासिक करारावर नियुक्ती करण्यात येईल. या कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांना वार्षिक नूतनीकरणीय करार दिला जाईल.

इच्छुक उमेदवारानी आपले नाव, पत्ता जन्मतारिख, शैक्षणिक पात्रता अनुभव इत्यादी कागदपत्रांच्या छायाप्रतींसह अर्ज पाठवावा. अर्ज जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून **15 दिवसांत कार्यालय प्रमुख, नवीन प्रसारण भवन, एच.टी.पारेख मार्ग, आकाशवाणी, मुंबई - 400 020** या पत्त्यावर पाहोचणे आवश्यक आहे. अर्जावर जिल्हयाचा उल्लेख करावा. उमेदवाराने अर्जासोबत संबंधित प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडणं आवश्यक आहे. उमेदवार अनुसूचित जाती-जमातीचा असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे. अर्ज पूर्ण नसल्यास ते ग्राहय धरले जाणार नाहीत. उमेदवार कुठल्याही राजकीय पक्षाचा सदस्य असू नये. केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा केंद्रशासित प्रशासना मधल्या तसेच सार्वजनिक उपक्रमातल्या कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

भवदीय,

(पी.डी.गोगटे)

सहायक अभियंता / डीडीओ

कृते अपर महानिदेशक